# उच्च व तंत्र शिक्षण विभाग

## नोटीस

## Vertical University Campus स्थापन करण्यासंदर्भात हरकती व सूचना

राज्यात स्वयं-अर्थसाहाय्यित विद्यापीठाची स्थापना करण्यासाठी दिनांक १९ जानेवारी, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारित मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्या मार्गदर्शक सूचनांमध्ये स्वयं-अर्थसाहाय्यित विद्यापीठांच्या स्थापनेसाठी जमिनीचे निकष निश्चित करण्यात आले आहे. ते खालीलप्रमाणे आहेत :

| | | |
|---|---|---|
| इ. | ग्रामीण क्षेत्र | २५ एकर; |
| म. | तहसील किंवा जिल्हा मुख्यालय | १५ एकर; |
| ग. | विभागीय मुख्यालय | १० एकर; |
| ड. | सर्व महानगर प्रदेश विकास प्राधिकरण प्रदेश हद्द (उदा. एमएमआरडीएस, पीएमआरडीए इ.) | १० एकर |

तथापि, मुंबई शहर, नवी मुंबई, ठाणे, पुणे या शहरांमध्ये स्वयं-अर्थसाहाय्यित विद्यापीठ स्थापन करू शकणाऱ्या अनेक शैक्षणिक संस्थांना स्वयं-अर्थसाहाय्यित विद्यापीठ स्थापन करण्यासाठी आवश्यक क्षेत्र १० एकर (जागा) उपलब्ध होत नाही, असे निदर्शनास आले आहे. त्यामुळे Vertical University Campus स्थापन करावयाचे प्रस्तावित आहे.

- अमेरिका, ब्रिटन, ऑस्ट्रेलिया, जपान या देशांच्या धर्तीवर राज्यामध्ये Vertical University Campus स्थापन करण्याचे प्रस्तावित आहे.
- Vertical University Campus मध्ये विद्यार्थ्यांची क्षमता २०,००० इतकी असावी.
- Vertical University Campus मुंबई शहर, नवी मुंबई, ठाणे, पुणे शहरांतील ठिकाणी Vertical University Campus स्थापन करण्यास परवानगी देण्याचे प्रस्तावित आहे. पहिल्या टप्प्यामध्ये मुंबई शहरामध्ये सदर धोरण राबविण्याचे प्रस्तावित आहे.
- Vertical University Campus स्थापन करण्यासाठी ज्या प्रायोजक मंडळांना NAAC ची ३.२५ ग्रेड पॉइन्ट, NBA किंवा NIRF यामध्ये पहिल्या २०० मध्ये आलेले प्रायोजक मंडळ अर्ज करण्यास पात्र राहील.
- स्वतःच्या मालकीची किंवा किमान ३० वर्षे भाडेतत्त्वावर असलेली जमीन प्रायोजक मंडळांकडे असायला हवी. त्या जमिनीवर २०,००० sq.mts.चे बांधकाम झालेले हवे.
- प्रायोजक मंडळाकडे जर स्वतःच्या मालकीची जमीन नसेल तर जमीन भाडेतत्त्वावर घेतलेली असेल तर त्या जागेवर Vertical University Campus स्थापन करण्यासाठी मूळ मालकाचे ना-हरकत प्रमाणपत्र असणे बंधनकारक राहील.
- Vertical University Campus या इमारतीमध्ये फक्त शैक्षणिक कामकाज करण्यात येईल.
- Vertical University Campus इमारतीमध्ये खासगी/ वाणिज्यिक व्यवसाय सुरू करता येणार नाही.
- Vertical University Campus स्थापनेसाठी किमान १० कोटींचा दाननिधी असायला हवा व ५ वर्षांमध्ये तो २० कोटींपर्यंत वाढविण्याची तरतूद विद्यापीठ स्थापनेकरिता करावला हवी.

समितीने यासंदर्भात केलेल्या सूचनांनुसार Vertical University Campus स्थापन करण्यासंदर्भात धोरण निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. यासंदर्भात धोरण निश्चित करण्यासाठी शैक्षणिक संस्था, व्यक्ती यांच्याकडून सूचना मागविण्यात येत असून यासंदर्भात काही सूचना/ हरकती असल्यास प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ या पत्त्यावर पत्राने किंवा psec.higheredu@maharashtra.gov.in ई-मेलवर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या कालावधीत पाठविता येतील.

डीजीआयपीआर/२०२२-२०२३/५/११७२